## २. १९९१ नंतरच्या महत्त्वाच्या संकल्पना आणि समस्या : जागतिकीकरण

**प्र.१ (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधान पूर्ण करा.**
**(१) जागतिकीकरणाच्या युगात आर्थिक क्षेत्रात खालील महत्त्वाचे बदल झाले.**
**(i) भांडवल गुंतवणुकीचा मुक्त संचार**
**(ii) गॅटची निर्मिती**
**(iii) ट्रान्स-नॅशनल कंपनीचा उदय**
**(iv) बौद्धिक संपदा हक्क यावर लक्ष केंद्रित**
**उत्तर:**
(अ) फक्त i, ii आणि iii बरोबर आहेत.
(ब) फक्त i, ii आणि ivबरोबर आहेत.
**(क) फक्त i, iii आणि ivबरोबर आहेत.**
(ड) सर्व बरोबर आहेत.

**(२) 'साम्यवादी बाजारपेठीय अर्थव्यवस्था' ही संकल्पना या देशासंदर्भात वापरली जाते.**
(अ) भारत
**(ब) चीन**
(क) फ्रान्स
(ड) अमेरिका

**(ब) गटान न बसणारा शब्द ओळखा.**

**(१) मोबाइल, सॅटेलाईट, इंटरनेट, ग्रामोफोन**
**उत्तरे :**
**गटान न बसणारा शब्द:**
(ग्रामोफोन (जागतिकीकरणाशी संबंध नाही)

**(क) संकल्पना सुचवा.**

**(१) आंतरराष्ट्रीय व्यापारासंबंधी एकमेव आंतरराष्ट्रीय संघटना-**
**उत्तर:** World Trade Organization

**(२) अनेक देशांत कार्यरत असलेली कंपनी-**
**उत्तर:** बहुराष्ट्रीय कंपनी

**प्र.२ खालील विधाने चूक की बरोबर सकारण स्पष्ट करा.**

**(१) जागतिकीकरणाने बाजारपेठीय अर्थव्यवस्था ही संकल्पना आणली**
**उत्तर:** वरील विधान चूक आहे.
**कारणे:** (१) बाजारपेठीय अर्थव्यवस्थेचे स्वरूप त्या राज्याच्या विचारप्रणालीवर अवलंबून असे.
(२) ज्यास अमेरिकेत बाजारपेठीय अर्थव्यवस्था म्हणतात, त्यास आर्थिक उदारीकरण ही संज्ञा भारतात वापरली जाते.

**(२) जागतिकीकरणात बिगर सरकारी संस्थांचे महत्व कमी झाले आहे**.
**उत्तर:** वरील विधान चूक आहे.
**कारण:** जागतिक स्तरावर बिगर सरकारी संस्थांचे महत्त्व वाढले आहे.

**प्र.३ सहसंबंध स्पष्ट करा.**

**(१) जागतिकीकरण आणि संस्कृती,**
**उत्तर:** (१) जागतिकीकरण संस्कृतीचा वाहक आहे.
(२) समाजात व्यक्तिवाद व भौतिकवाद वाढला आहे.
(३) पारंपरिक मूल्यांपेक्षा आधुनिकीकरण व पाश्चिमात्यीकरण ही मूल्ये अधिक महत्त्वाची वाटू लागली आहेत.
(४) खानपानमध्ये बर्गर व पिझ्झासारख्या परकीय खाद्यपदार्थांना महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे.

**(२) गॅट आणि जागतिक व्यापार संघटना.**
**उत्तर:** (१) दुसऱ्या महायुद्धानंतर जागतिक व्यापारात संतुलन प्रस्थापित करण्यासाठी General Agreement on Trade and Tariff हा करार करण्यात आला होता.
(२) या कराराची कार्यवाही करणारी कोणतीही यंत्रणा नव्हती.
(३) १९९५ साली World Trade Organization या संघटनेची स्थापना करून, आंतरराष्ट्रीय व्यापारावर नियंत्रण करणारी यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली.
(४) म्हणजेच WTO ची स्थापना ही GATT कराराचे पुढचे पाऊल आहे.

**प्र. ४ मत नोंदवा.**

**(१) सहभागयुक्त (सहभागी) राज्य समाजासाठी हितकारक आहे.**
**उत्तर:** सहभागयुक्त (सहभागी) राज्य समाजासाठी हितकारक आहे. या विधानाशी मी सहमत आहे.
**कारणे:** (१) ही संकल्पना लोकशाहीशी सुसंगत आहे.
(२) सहभागाद्वारा नागरिकांच्या राजकीय जाणिवा अधिक प्रगल्भ होतील.
(३) राज्यकार्यांवर प्रजेचा नागरिकांचा अंकुश प्रस्थापित होईल.

**प्र.५पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा:**

**(१) जागतिकीकरणाच्या सकारात्मक व नकारात्मक बाजू कोणत्या आहेत?**
**उत्तर: (अ) सकारात्मक बाजू:**
(१) तरुणांसाठी आपल्या देशात आणि परदेशात नोकरी व्यवसायाच्या नवीन संधी उपलब्ध होत आहेत.
(२) खासगी क्षेत्रात अधिक रोजगार निर्मिती होत आहे.
(३) आपण अधिक कार्यक्षम पद्धतीने जगाशी जोडले गेलो आहोत. जगात काय चालले आहे आणि त्याचा आपल्यावर काय परिणाम होईल याची अधिक चांगली जाणीव होते.
**(ब) नकारात्मक बाजू:**
(१) राज्याच्या कल्याणकारी योजना स्थगित होण्याची शक्यता आहे.
(२) स्थानिक उद्योगधंदे, विशेषतः लहान उदयोग हे जागतिक स्पर्धेमुळे नष्ट होतील, ही देखील भीती आहे.
(३) शेतीच्या क्षेत्रात लहान आणि किरकोळ शेतकरी मोठ्या कंपन्यांशी स्पर्धा करू शकणार नाहीत.